## नि.क्र. १ वरील आदेश

( दिनांक ०३.१२.२०२४ रोजी पारित)

प्रस्तुत प्रकरणी नि.२१ कडे आरोपी क्र. १ व २ यांनी त्यांना या प्रकरणातून दोषमुक्त करण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास तालुका कृषी अधिकारी गोंडपिपरी यांनी नि. २४ कडे तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी देखील त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रथम या न्यायालयामध्ये आरोपी प्रविण वासुदेवराव वानखेडे यांचे बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार दोषारोपपत्र दाखल करण्याचे तपासी अंमलदार यांनी राखुन ठेवले होते. त्यानंतर पुन्हा तपासी अंमलदार यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या परवानगीने या प्रकरणी सदर आरोपी प्रविण वानखेडे यांचे विरूध्द पुरवणी दोषारापेपत्र दाखल केले आहे. सदर आदेशानुसार मा. उच्च न्यायालय यांनी सदर आरोपी बाबत दोषारोपपत्र दाखल करण्याची मुभा तपासी अंमलदार यांना दि. २३.०७.२०२४ रोजीच्या आदेशान्वये दिल्याचे दिसुन येते. सदर प्रकरणी नि.२१ मधील अर्जामध्ये आरोपी यांनी सदर प्रकरणी दाखल केलेले दोषारोपपत्र कायदेशीर तरतुदीनुसार चुकीचे व गैरकायदेशीर असल्याबाबत कथन केले आहे.  मा. उच्च न्यायालय यांनी सह आरोपी बाबत दोषारोपपत्र दाखल करण्याची मुभा दिलेली असताना दोषारोपपत्राद्वारे सदरचे प्रकरण दाखल करण्याची प्रक्रिया चुकीची असल्याबाबतचे आरोपी यांचे कथनावर मा.उच्च न्यायालय यांचे समोर सदरचे प्रकरणातील वाद प्रलंबित असताना निर्णय घेणे योग्य होणार नाही. तसा कोणताही निर्णय मा. वरिष्ठ न्यायालयासमोर वाद प्रलंबित असताना घेणे म्हणजेच मा. वरिष्ठ न्यायालय यांचे कार्यक्षेत्रामध्ये हस्तक्षेप केल्याप्रमाणे

होणार आहे. सबब, प्रस्तुतचे प्रकरण मा. उच्च न्यायालय यांचे कडील अर्ज क्र. ५५०/२०२० या प्रकरणातील पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

Pratik Ganesh Lambe Digitally signed by Pratik Ganesh Lambe Date: 2024.12.04 11:44:53 +0530

( पी. जी. लंबे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
गोंडपिपरी.

दिनांक : ०३.१२.२०२४

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द-नि-शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : उमेश रामप्रसाद आमटे |
| न्यायालयाचे नाव | : न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, गोंडपिपरी |
| आदेशाची तारीख | : ०३.१२.२०२४ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०३.१२.२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : ०३.१२.२०२४ |

............